**केंद्र पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण उपअभियानांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र तसेच राज्य हिस्सा निधी वितरीत करणेबाबत.**

( लेखाशिर्ष २४०१ A४५९ (केंद्र हिस्सा) व २४०१ A४४१ (राज्य हिस्सा)

**महाराष्ट्र शासन**

**आदिवासी विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७ / प्र.क्र.११ / कार्यासन.६**

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

तारीख: - ०३ मार्च, २०१८.

<u>वाचा -</u>

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७ /प्र.क्र.६८ / अर्थ-३, दि. ०१.०४.२०१७.

२) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७.

३) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४ / अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७ व ०६.०२.२०१८

४) केंद्र शासन, कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्रालय यांचे पत्र क्र. NO.३-१/२०१५-M&T (I & P,) दि. १९ फेब्रुवारी, २०१८.

५) आविवि, शासन निर्णय, समक्रमांक दिनांक २७-०६-२०१७ व १०-११-२०१७

६) कृषि व पदुम विभागाची नस्ती क्र. कृयांयो- १०१७/ प्र. क्र. २११ /१७ / ४-अे.

**शासन निर्णय :-**

राज्यात केंद्र शासनाने कृषि यांत्रिकीकरण उप अभियानांतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी लेखाशिर्ष मागणी क्र. टी-५, २४०१, पीक संवर्धन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजना अंतर्गत योजना, (०१) (११) कृषि उन्नती योजना-कृषी यांत्रिकीकरण उपअभियान, ( २४०१ A ४५९) - ३३ अर्थसहाय्य (केंद्र हिस्सा) या योजनेंतर्गत रु. ५९०.०५ लाख इतका निधी तर राज्य हिश्याकरिता (०१) (१०) कृषि उन्नती योजना-कृषी विषयक यांत्रिकीकरण उपअभियान, (२४०१ A ४४१ ) - ३३ अर्थसहाय्य या योजनेंतर्गत रु. ३९३.३६ लाख इतका निधी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता अर्थसंकल्पित केलेला आहे.

केंद्र शासनाने उपरोक्त योजनेंतर्गत सन २०१६-१७ करिताचा केंद्र हिस्सा रु.२२२.०० लाख इतका निधी संदर्भ क्र. ४ येथील पत्रान्वये दुसऱ्या हफ्त्याच्या स्वरूपात वितरीत केला आहे. त्यानुषंगाने कृषि व पदुम विभागाच्या वाचा क्र. ६ येथील प्रस्तावाच्या अनुषंगाने सदरचा निधी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पित निधीतून मागणी क्र. टी-५, २४०१, पीक संवर्धन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजना अंतर्गत योजना, (०१) (११) कृषि उन्नती योजना-कृषी यांत्रिकीकरण उपअभियान, ( २४०१ A ४५९) - ३३ अर्थसहाय्य (केंद्र हिस्सा ) या लेखाशिर्षाखाली रु. २२१.८४ लाख (रुपये दोन कोटी एकवीस लक्ष चौऱ्यांऐंशी हजार फक्त ) इतका निधी तर समरुप राज्य हिस्सा (०१) (१०) कृषि उन्नती योजना-कृषी विषयक यांत्रिकीकरण उपअभियान, (२४०१ A ४४१ ) - ३३ अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली रु. १४७.८९ लाख (रुपये एक कोटी सत्तेचाळीस लक्ष एकोणन्नवद हजार फक्त ) इतका निधी प्रशासकीय विभाग / नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS ) वितरीत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. प्रकरणी नियंत्रण अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व कृषि व पदुम विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

३. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर संनियंत्रण ठेवता येईल.

४. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्यांकरिता व आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लाभार्थ्यांकरिताच खर्च करण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या **वाचा** क्र.१, २ व ३ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच अनौपचारिक संदर्भ क्र. ७८/ अर्थोपाय, दि. २२-०२-२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत असून सदर शासन निर्णयातील अटींची पुर्तता होत असल्याची कृषि व पदुम विभागाने खात्री करावी.

६ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201803031253034124 असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2018.03.06 12:04:17 +05'30'

(रविंद्र दि. औटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. प्रधान सचिव (कृषि) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य.
३. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
४. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक / नागपूर / ठाणे / अमरावती.
५. वित्त विभाग (अर्थसंकल्प- १९), मंत्रालय, मुंबई.

६. कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई.
७. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा मजला, विधानभवन, मुंबई.
८. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
९. कार्यासन क्र. २ व ९, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१०. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.